# बृहन्मुंबई महानगरपालिका

## शिक्षण विभाग

शिक्षणाधिकारी यांचे मुख्य कार्यालय, त्रिवेणी संगम मनपा शालेय इमारत,
महादेव पालव मार्ग, करी रोड (पूर्व), मुंबई – ४०० ०१२

**माहिती पुस्तिका/ अर्ज क्रमांक :**

# बालवाडी उपक्रम

बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील शाळांमध्ये सुरु असलेल्या बालवाडी वर्गांवर शिक्षिका व मदतनीस नियुक्त करण्यासंदर्भात स्वयंसेवी संस्थांकडून स्वारस्य अभिरुचीसाठी अर्ज.

---

Expression of Interest for Appointment of Teachers and Helpers in Balwadi class in Brihanmumbai Municipal Corporation Schools.

---

**स्वारस्य अभिव्यक्ती** (Expression of Interest)

बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सन २००७-०८ या शैक्षणिक वर्षापासून ३ ते ६ वर्षे वयोगटातील मुलांसाठी बालवाडी वर्ग चालविण्यात येत आहेत. महानगरपालिकेच्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांची गळती रोखण्यासाठी आणि इ.१ ली त प्रवेश घेण्यापुर्वी त्यांचा पूर्व प्राथमिक वर्गाद्वारे शैक्षणिक विकास व्हावा या उद्देशाने महानगरपालिकेमार्फत हे बालवर्ग चालविले जातात.

सद्यस्थितीत बृहन्मुंबई महानगरपालिकेअंतर्गत चालवीत असलेल्या सर्व माध्यमाच्या शाळांमधील बालवाडी वर्गासाठी शिक्षिका व मदतनीस यांच्या नेमणूकांसह पुर्व प्राथमिक वर्गाचे कामकाज करण्यासाठी स्वयंसेवी संस्थांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. अर्ज प्राप्त झाल्यानंतर त्यांची छाननी करण्यात येऊन, त्याची सक्षम अधिकारी/ प्राधिकारी यांच्या मान्यतेने निवड करण्यात येईल. संस्थेची निवड ही संस्थेची क्षमता विचारात घेऊन करण्यात येईल. बालवाडी वर्ग चालविण्यासाठी किमान २० वर्गांकरीता व कमाल ५० ते १०० वर्गांकरीता संस्थेने अर्ज करणे अपेक्षित आहे. संस्थेची नियुक्ती ३ वर्षांकरीता असेल, संस्थेची नियुक्ती दरवर्षी संस्थेच्या कामाचा दर्जा, कामकाजाची प्रक्रिया पूर्ण करणे, संस्थेचा शैक्षणिक कामाचा अनुभव, संस्था किती वर्षापासून कार्यरत आहे, संस्था समाजातील मुलांसाठी इतर कोणते उपक्रम राबवित आहे, या योजनेसाठी संस्थेचे भविष्यातील उपक्रम इ. बाबींचा विचार करण्यात येईल. बालवाडीचे वर्ग चालविण्याचे काम करण्यासाठी संस्थेने **"ना-नफा ना तोटा"** या तत्वावर काम करणे अपेक्षित आहे. **सद्यस्थितीत बालवाडी उपक्रमामध्ये कार्यरत संस्थांनीही पुन्हा स्वारस्य अभिरुची प्रस्ताव नव्याने सादर करणे क्रमप्राप्त आहे. सद्यस्थितीत कार्यरत संस्थांना प्रथम प्राधान्य देण्यात येईल.**

## योजनेचे स्वरुप

बालवाडी वर्गासाठी आवश्यक असलेल्या पायाभूत सुविधा संपूर्णत: महानगरपालिकेमार्फत पुरविल्या जातात. ज्यामध्ये -

- पूर्व प्राथमिक वर्गासाठी आवश्यक तितक्या वर्गखोल्या
- सर्व वर्गखोल्या ह्या रंगरंगोटी व बोलक्या भिंती असलेल्या
- वर्गातील बैठक व्यवस्था – चटई / छोटे डेस्क-बेंच
- वर्गासाठी आवश्यक खेळाची विविध साधने (साहित्य)/ शालेय आवारात खेळणी बसविलेली आहेत. (उदा. घसरगुंडी, झोपाळा इत्यादी)
- विद्यार्थ्यांसाठी आवश्यक असलेल्या शैक्षणिक व शालोपयोगी वस्तू (गणवेश, स्कूल किट्स, शूज)
- वर्ग चालविण्यासाठी संस्थेस आवश्यक सादिल – (खर्च ज्यामधून संस्था वर्गासाठी आवश्यक ते साहित्य / स्टेशनरी पुरवतील)

## <u>संस्थेच्या पात्रतेचे निकष</u>

१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शाळेतील बालवर्गांमध्ये बालवाडी शिक्षिका व मदतनीस नियुक्त करण्याकरीता स्वारस्य अभिरुची असलेली स्वयंसेवी संस्था ही सार्वजनिक विश्वस्त अधिनियम – १९५० किंवा संस्था नोंदणी अधिनियम १८६०, सहकारी अधिनियम संस्था १९६० यापैकी कोणत्याही अधिनियमाखाली नोंदणीकृत झालेली असावी.

२) संस्थेने शैक्षणिक क्षेत्रात काम केलेले असावे व सामाजिक कार्याची त्याला जोड असावी / बांधिलकी असणे गरजेचे आहे.

३) संस्थेकडे स्वत:चे प्रशिक्षित मनुष्यबळ असणे गरजेचे आहे. ज्यायोगे संस्थेस वर्गाचे कामकाज सुरळीतपणे पार पाडणे शक्य होईल.

४) ज्या स्वयंसेवी संस्थमार्फत धर्म, जात, वंश याआधारे कोणताही भेदभाव न करणा-या व कोणत्याही विशिष्ठ धर्माचा प्रचार / प्रसार न करणा-या स्वयंसेवी संस्थाच या योजनेमध्ये पात्र राहतील.

५) स्वयंसेवी संस्थेस बालवाडी योजनेचे काम **'ना- नफा' 'ना-तोटा'** या तत्वावर करणे आवश्यक आहे.

६) स्वयंसेवी संस्थेवर कोणत्याही प्रकारचे दोषारोप / फौजदारी गुन्हा दाखल असता कामा नये. कोणत्याही प्रकारच्या कोर्टात संस्थेच्या विरोधात केस प्रलंबित नसावी.

७) विद्यमान बालवाडी वर्ग चालविणा-या NGO / संस्था यांना प्राधान्य देण्यात येईल.

<u>**निवड प्रक्रिया**</u>

१) पात्रतेचे सर्व निकष पूर्ण करणारी संस्थाच अर्ज करण्यास व निवडीस पात्र ठरेल.

२) विहित मुदतीत व परिपूर्ण अर्ज सादर करणारी संस्थाच निवडीस पात्र राहील.

३) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या परिक्षेत्रातील कोणत्याही विभागात (वॉर्ड) काम करण्यास तयार असणारी संस्थाच निवडीस पात्र राहील.

४) संस्था त्यांच्या आर्थिक उलाढालीच्या कुवतीप्रमाणे किती बालवाडी वर्गाचे काम करण्यास सक्षम आहे त्यावरुन निवड करण्यात येईल.

५) छाननी प्रक्रियेतून पात्र ठरलेल्या स्वयंसेवी संस्थांनाच मुलाखतीसाठी निमंत्रित केले जाईल.

६) छाननी व निवडीबाबतचे सर्व अधिकार शिक्षणाधिकारी, बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्याकडे राहतील.

७) नव्याने नियुक्त करण्यात येणा-या संस्थांची निवड पुढील ३ वर्षांकरीता करण्यात येईल.

८) निवड करण्यात आलेल्या संस्थांच्या कामकाजाचे मुल्यमापन करुनच प्रत्येक वर्षी उपक्रमास नुतनीकरण करण्यात येईल.

९) निवड करण्यात आलेल्या संस्थांना ३ वर्षानंतर सातत्य देण्याकरीता सह आयुक्त (शिक्षण) यांच्या स्तरावर मान्यता घेऊन कामकाज नियमित सुरु ठेवण्यात येईल.

१०) त्यापुढे कामकाज सुरु ठेवावे किंवा पुनश्च: स्वारस्य अभिरुची प्रस्ताव मागवावेत याबाबत सर्व अधिकार अति. आयुक्त / मा. आयुक्त यांच्या आदेशानुसार करण्यात येईल.

११) स्वारस्य अभिरुचीसाठी जास्त संस्थांनी अर्ज सादर केल्यास निवड समिती गठित करुन त्यामार्फत गुणांकन करुन संस्थांची शिक्षणाधिकारी यांच्यामार्फत लॉटरी पध्दतीने निवड करण्यात येईल.

१२) संस्थेने किमान २० व कमाल १०० वर्गाची मागणी केलेली असावी .

१३) **स्वारस्य अभिरुची प्रस्ताव सादर करतांनाच इच्छूक संस्थांनी वर्गाच्या मागणीनुसार प्रति वर्ग रु.८,२००/- याप्रमाणे सुरक्षा अनामत रक्कम** 'BRIHANMUMBAI MUNICIPAL CORPORATION' **च्या नावे** Demand Draft **सादर करणे आवश्यक राहील.** Demand Draft **विहित कालावधी नंतर सादर करणा-या संस्था अपात्र ठरतील.** त्याचप्रमाणे भविष्यात बालवाडी वर्गावरील मानधनाच्या रकमेमध्ये वाढ झाल्यास त्याप्रमाणे सुरक्षा अनामत रकमेचे नुतनीकरण

करणे निवड केलेल्या संस्थेस बंधनकारक राहील. बालवाडी वर्ग चालवावयास घेणा-या संस्थेस प्रति वर्षी नुतनीकरणाचा प्रस्ताव सादर करणे क्रमप्राप्त राहील.

**<u>निवड करण्यात येणा-या संस्थेंच्या जबाबदा-या :</u>**

**१)** बालवाडी वर्ग चालविण्यास निवड करण्यात येणा-या स्वयंसेवी संस्थेस पत्राद्वारे लेखी कळविण्यात येईल.

**२)** बालवाडी च्या वर्गाकरीता आवश्यक शैक्षणिक अर्हता धारक शिक्षिकांची व मदतनीसांची नेमणूक करण्याची जबाबदारी संस्थेची राहील.

**३)** बालवाडी वर्गावरील शिक्षिका तसेच मदतनीस यांचा महानगरपालिका प्रशासनाशी थेट संबंध असणार नाही. तसेच, संस्थेने बालवाडीच्या वर्गावरील शिक्षकांना व मदतनीसांना महानगरपालिका सेवेत भविष्यात हक्क सांगता येणार नाही.

**४)** संस्थेने नियुक्त केलेल्या बालवाडीच्या वर्गावरील शिक्षिका ह्या शालांत परिक्षा तसेच व्यावसायिक बालवाडी कोर्स (मॉन्टेसरी कोर्स) पात्रता धारण केलेल्या असाव्यात. बालवाडीच्या वर्गावर त्या त्या माध्यमातून बालवाडी कोर्स (मॉन्टेसरी कोर्स) केलेल्या शिक्षिकेची त्या वर्गावर नियुक्ती करणे क्रमप्राप्त राहील.

**५)** बालवाडीच्या विद्यार्थ्यांचा वयोगट पाहता या वर्गावरील शिक्षक व मदतनीस या पदावर फक्त महिला उमेदवारांची नेमणूक करण्यात यावी.

**६)** संस्थेने नियुक्त केलेल्या बालवाडीच्या वर्गावरील शिक्षिका व मदतनीस ह्या १८ ते ३५ या वयोगटातील असाव्यात.

**७)** संस्थांमार्फत नियुक्त करण्यात येणा-या शिक्षिका व मदतनीस यांना वेळोवेळी सेवाभावी संस्थांद्वारे सी.एस.आर. अंतर्गत प्रशिक्षण उपलब्ध करुन देण्यात येईल. सदरच्या प्रशिक्षणास शिक्षिका व मदतनीस यांना उपस्थित ठेवणे संस्थेची जबाबदारी राहील.

८) मदतनीस कमीत कमी सातवी उत्तीर्ण असावी.

**९)** बालवाडीच्या वर्गावरील शिक्षिका व मदतनीस यांची नियुक्ती माहे जून ते मार्च या १० महिन्याच्या कालावधीसाठी अनुज्ञेय राहील.

**१०)** सदर बालवाडी वर्गातील विद्यार्थ्यांचे वयाची ६ वर्षे पुर्ण झाल्यानंतर त्या विद्यार्थ्यांनी मनपाच्याच शाळेत किंवा मुंबई पब्लिक स्कूल मध्ये प्रवेश घेणे अपेक्षित आहे. जेणेकरुन मनपाच्या इ. १ ली चा पट वृध्दींगत होईल व मनपाच्या शाळा ख-या अर्थाने टिकून राहतील.

११) संस्थेने मागणी केलेल्या बालवाडीच्या वर्गाबाबत वेळोवेळी शिक्षण विभागाकडून दिलेल्या सुचनांप्रमाणे अहवाल इत्यादी सादर करण्याकरिता समन्वय साधण्यासाठी सहकार्य करणे क्रमप्राप्त राहील.

१२) मनपा शाळांमधील बालवाडीच्या वर्गामध्ये कमीत कमी २० विद्यार्थी व कमाल ४० पटसंख्या असणे आवश्यक , जिथे पटसंख्या जास्त असेल तिथे वर्गखोलीची उपलब्धते सापेक्ष बालवाडीची पटसंख्या मुख्याध्यापकाने निश्चित करावी.

१३) संस्थेने नियुक्त केलेल्या बालवाडीच्या वर्गांवरील शिक्षिका व मदतनीस यांच्या त्या-त्या महिन्यातील उपस्थितीच्या दिवसानुसारच त्यांचे मानधन अदा करण्यात येईल.

१४) संस्थेने मनपा मार्फत मिळणारे संपूर्ण मानधन शिक्षक व मदतनीस यांना देण्यात यावे.

१५) संस्थेने बालवाडीच्या शिक्षिका व मदतनीस यांचे माहे जून ते माहे मार्च या १० महिन्यांचे मानधनाच्या प्रत्येक महिन्यात संकलित फाईल सादर करणे क्रमप्राप्त राहील.

१६) प्रत्येक महिन्यात महापालिकेकडून अदा करण्यात आलेल्या मानधनाचे लेखा बंद धारिणी पुढील महिन्यात सादर करणे क्रमप्राप्त राहीत.

**<u>सर्वसाधारण अटी व शर्ती</u>**

अ) अर्जदार संस्थेने सादर केलेल्या सर्व कागदपत्रातील प्रत्येक पानावर त्यांची सही व शिक्का असणे आवश्यक आहे. अपूर्ण कागदपत्रे असलेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही.

आ) बालवाडी वर्ग चालविण्याकरिता मागविण्यात आलेले अर्ज कुठलेही लेखी अथवा तोंडी कारण न देता स्विकृत करणे, नाकारणे किंवा रद्द करणे याबाबतचे सर्व अधिकार मान. शिक्षणाधिकारी, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचेकडे राहतील.

इ) दरवर्षी सदर परवानगीचे कामकाजाचे स्वरुप पाहून नूतनीकरण करण्यात येईल.

ई) शाळा समायोजन/ वर्ग स्थलांतराचे अधिकार शिक्षणाधिकारी यांना राहतील.

उ) सेवाभावी संस्थांमार्फत कार्यरत असलेल्या बालवाडी वर्गावरील शिक्षिका व मदतनीस यांना संस्थेमार्फत नियुक्त केलेले असल्याने त्यांना बृहन्मुंबई महानगरपालिका सेवेमध्ये भविष्यात हक्क सांगता येणार नाही.

ऊ) मनपा शाळांतील बालवाडी वर्गातील विद्यार्थ्यांची योग्य ती काळजी घेण्याची जबाबदारी संस्थेची राहील, वर्गातील विद्यार्थ्यांच्या बाबतीत कोणताही गैरप्रकार घडल्यास, कोणत्याही प्रकारचा हलगर्जीपणा अथवा बेजबाबदारपणा निदर्शनास आल्यास संस्थेस दंड आकारण्यात येईल, दंडाच्या रक्कमेची वसूली सुरक्षा अनामत रकमेतून करण्यात येईल.

ऋ) संस्था काम करण्यास अथवा अटी शर्तींचे पालन करण्यास असमर्थ/ अयशस्वी ठरल्यास त्यांचे काम कोणत्याही प्रकारची लेखी स्वरुपात पूर्वसूचना न देता रद्द करण्याचा अधिकार शिक्षणाधिकारी, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना राहील.

ऌ) सदर योजनेंतर्गत संस्थेस ज्या शाळांचे बालवाडी वर्ग देण्यात आलेल्या आहेत त्याच शाळेतील वर्ग चालविणे क्रमप्राप्त राहील. शाळेतील वर्ग इतर कोणत्याही कामासाठी संबंधित संस्थेस वापरता येणार नाही.

ऍ) बालवाडी वर्गावरील शिक्षिका व मदतनीस यांना उद्भवणा-या अडचणी किंवा समस्या यांचे निराकरण योग्य पध्दतीने संस्थेच्या स्तरावर होणे अपेक्षित आहे.

ऐ) संस्थेद्वारे नियुक्त केलेल्या बालवाडी शिक्षिका व मदतनीस यांचे मानधन वेळेवर मिळत नसल्याबाबत तक्रारी प्राप्त होता कामा नये. मनपा मार्फत अदा केलेले मानधन शिक्षिका व मदतनीस यांच्या बॅक खात्यावर विनाविलंब टाकण्याची कार्यवाही संस्थेने स्व:च्या स्तरावर करावी.

## कामाकाजाचा कालावधी :

१) बालवाडी वर्ग माहे जून पासून सुरू होतील व 31 मार्च अखेरपर्यंत चालतील.

२) सदर वर्गावर नियुक्त करण्यात येणा-या शिक्षिका व मदतनीस यांनी शनिवार, रविवार आणि सुट्टीचे दिवस वगळता दररोज सकाळ सत्र किंवा दुपार सत्रामध्ये ४ तास वर्ग घेणे बंधनकारक राहील.

३) तथापि, प्रत्येक शनिवारी बालवाडी वर्गावरील शिक्षिकांनी पुढील आठवड्याचे साप्ताहीक नियोजन करणे आवश्यक आहे.

## शिक्षिकांची नियुक्ती

१) बालवाडी वर्गावरील सेवाभावी संस्थांनी त्यांच्या अखत्यारित बालवाडी वर्गावरील शिक्षिकांची नियुक्ती करावी.

२) सदर नियुक्ती ही १ जून ते ३१ मार्च या १० महीन्याच्या कालावधीसाठी राहील.

३) माहे एप्रिल व मे या महीन्यांचा कालावधी तांत्रिक खंड गणण्यात येईल.

४) शिक्षण विभागाने ठरवून दिलेल्या कालावधीत प्रत्यक्ष परीसरात फिरुन विद्यार्थ्यांच्या प्रवेशासाठी सर्वेक्षण करणे क्रमप्राप्त राहील.

५) या वर्गावरील शिक्षिकांची शैक्षणिक अर्हता किमान शालांन्त परीक्षा उत्तीर्ण असावी. बालवाडी कोर्स (मॉटेसरी कोर्स) त्या–त्या माध्यमातूनच असणे आवश्यक राहील. वयोमर्यादा किमान १८ व कमाल ३५ वर्षे अशी राहील.

६) संस्थेने वयाचे ५८ वर्ष पूर्ण झालेल्या शिक्षिका यांच्या जागी नवीन शिक्षिका यांची नेमणूक करावी.

## मदतनीसांची नियुक्ती

1) मदतनीसांची नेमणूक देखील सेवाभावी संस्थांमार्फत करण्यात येईल.
2) शैक्षणिक अर्हता किमान सातवी उत्तीर्ण असेल.
3) त्याचप्रमाणे मदतनीस ही केवळ महिला असावी.
4) सदर नियुक्ती ही १ जून ते ३१ मार्च या १० महीन्याच्या कालावधीसाठी राहील.
5) माहे एप्रिल व मे या महीन्यांचा कालावधी तांत्रिक खंड गणण्यात येईल.
6) माहे जून मध्ये दिनांक १ जून ते शाळा सुरु होण्याच्या दिनांकापर्यंत प्रत्यक्ष परीसरात फिरुन विद्यार्थ्यांच्या प्रवेशासाठी सर्वेक्षण करणे क्रमप्राप्त राहील.
7) वयोमर्यादा किमान १८ वर्षे व कमाल ३५ वर्षे अशी राहील.
8) संस्थेने वयाचे ५८ वर्ष पूर्ण झालेल्या मदतनीस यांच्या जागी नवीन मदतनीस यांची नेमणूक करावी.

## शिक्षिकेचे / मदतनीसाचे मानधन

**१**. सेवाभावी संस्थांमार्फत नियुक्त करण्यात येणा-या शिक्षिका व मदतनीस यांस बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे दरमहा मानधन अदा करण्यात येईल. बालवाडी वर्गावरील शिक्षिका यांस दरमहा रु.५,०००/- व मदतनीस यांस रु.३,०००/- याप्रमाणे संस्थेद्वारे मानधन देण्यात येईल. त्याकरिता बालवाडी शिक्षिका व मदतनीस यांचे बँकेत खाते असणे आवश्यक आहे. महापालिकेमार्फत संस्थांना १० महिन्यांचे मानधन अदा करण्यात येईल,

त्यानंतर संस्थांनी नियुक्त केलेल्या बालवाडी शिक्षिका व मदतनीस यांना देय असलेली रक्कम प्रतिमाह दिले जाईल. शिक्षिका व मदतनीसांना अदा करण्यात आलेल्या मानधनाची पडताळणी प्रयोजनार्थ सदर रकमेचा विनियोग योग्य प्रकारे झाला आहे किंवा नाही याची तपासणी मनपा आयुक्तांनी प्राधिकृत केलेले अधिकारी यांजकडून करण्यात येईल.

त्याबाबत संस्थेमार्फत नियुक्त ज्या विभागातील शाळांमध्ये कार्यरत असलेल्या शिक्षिका व मदतनीस यांचे प्रभाव्य अहवाल प्रशासकीय अधिकारी (शाळा) यांच्यामार्फत शिक्षणाधिकारी यांचे कार्यालयात पाठवतील. त्यानंतर शिक्षणाधिकारी कार्यालयामार्फत संस्थांनिहाय/ विभागनिहाय एकत्रित देयके लेखा अधिकारी कार्यालयास पडताळणी / मंजूरीकरिता सादर करण्यात येतील. तद्नतर संस्थेने बालवाडी शिक्षिका व मदतनीस यांना मानधन अदा करणे क्रमप्राप्त राहील. मानधन प्राप्त झाल्याच्या पूढील महिन्यात बालवाडी शिक्षिका व मदतनीस यांना अदा केलेल्या मानधनाचा लेखा तपशील बंद करण्यासाठी (Account Closing) फाईल सादर करावी. याप्रमाणे कार्यवाही असेल.

## <u>दैनंदिन खर्चाकरिता सादिल</u>

बालवाडी वर्गाचे व्यवस्थापन सेवाभावी संस्थेमार्फत करण्यात येणार असून वर्गाच्या दैनंदिन खर्चाकरिता दरमहा रु.२००/- संस्थेस अदा करण्यात येईल. सेवाभावी संस्थांना देखील स्वतंत्र खाते उघडण्याच्या सूचना देण्यात येतील. या बँक खात्यामध्ये दरमहा रु.२००/- प्रति बालवाडी वर्ग सादिल जमा करण्यात येईल. पडताळणी प्रयोजनार्थ ही रक्कम अंतर्भूत करण्यात येईल. या खात्यातील रकमेचा विनियोग योग्य प्रकारे झालेला आहे किंवा नाही याची तपासणी महापालिका आयुक्तांनी प्राधिकृत केलेले अधिकारी यांजकडून करण्यात यईल. संस्थेने या रकमेची स्वतंत्र खाते वही ठेवणे अनिवार्य आहे.

- वरील अटी/शर्तीमध्ये आवश्यक ती वाढ करणे/सुधारणा करणे याबाबतचा अधिकार मान. आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचा राहील.

## <u>दंडात्मक कारवाईबाबत</u>

१) बालवाडी वर्गात शिकत असणारे विद्यार्थी हे ३ ते ६ वयोगटातील असल्याने या विद्यार्थ्यांची शालेय वेळेत योग्य काळजी घेण्याची जबाबदारी संस्थेची असेल. त्यात हलगर्जीपणा झाल्यास संस्थेवर दंडात्मक कारवाई तसेच जबाबदारी निश्चित करुन त्यांची सेवा खंडित / समाप्त केली जाईल.

२) संस्थेने नियुक्त केलेल्या शिक्षिका व मदतनीस यांचे मानधन बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत संस्थेस अदा करण्यात येते बालवाडी वर्गावरील शिक्षिका व मदतनीस यांस वेळेत मानधन देण्यात यावे, याबाबत दिरंगाई करण्यात येत असल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित संस्थेविरुध्द कारवाई करण्यात येईल.

३) शिक्षकांना वेळेत मानधन न मिळाल्यास शिक्षिका व मदतनीस वर्गावर चांगल्या प्रकारे लक्ष देणार नाहीत व त्याचा परिणाम बालवाडी वर्गावर होईल त्या संस्थेस Black List मध्ये टाकण्यात येऊन त्यांना चालविण्यास देण्यात आलेले बालवाडी वर्ग काढून घेण्यात येतील.

४) सेवा खंडीत केलेल्या संस्थेने भरलेले सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

# अर्जासोबत सादर करावयाची कागदपत्रे

1) संस्थेचे अध्यक्ष व सचिव तसेच संपर्क अधिकारी यांचे नाव, पदनाम, पत्ता, दूरध्वनी क्रमांक इ.बाबतचा तपशिल
2) संस्थेच्या उपविधीची प्रत/विधान पत्राची (Article of Association) प्रत.
3) संस्था नोंदणी प्रमाणपत्राची प्रत
4) संस्थेच्या कार्याचा अहवाल
5) संस्थेस शासकीय/निमशासकीय किंवा अंगणवाडी/ बालवाडी चालविण्यासंदर्भात अनुभव असल्यास त्याबाबतचे सक्षम प्राधिका-याचे प्रमाणपत्र
6) अर्ज भरण्यापूर्वी अंतिम आर्थिक बर्षापर्यंत लागू असलेला आयकर भरल्याचे प्रमाणपत्र (PAN व TAN च्या माहितीसह)
7) संस्थेचे सनदी लेखापाल यांनी प्रमाणित केलेले मागील 3 वर्षाचे नफा/तोटा विवरण पत्रक व आर्थिक ताळेबंद पत्रक
8) प्रतिज्ञापत्र - संस्थेच्या नियुक्ती पश्चात (रु. ५००/- च्या स्टॅम्प पेपरवर)
9) संस्था जेवढे वर्ग चालविण्यास तयार असेल तेवढया वर्गांचे सुरक्षा अनामत रक्कमेचा डिमांड ड्राफ्ट अर्ज सादर करतेवेळी जोडण्यात यावा.

सही/-
**शिक्षणाधिकारी**
**बृहन्मुंबई महानगरपालिका**

अर्जाचा क्रमांक

# स्वयंसेवी संस्थेने भरावयाच्या अर्जाचा नमुना

1) संस्थेचे संपूर्ण नाव : ______________________

______________________

2) संस्थेच्या कार्यालयाचा पूर्ण पत्ता : ______________________

दूरध्वनी क्रमांक ( STD कोडसह): ______________________

असल्यास e-mail address : ______________________

3) संस्थेच्या संपर्क अधिका-याचे नाव: ______________________

व पदनाम व पूर्ण पत्ता आणि ______________________

दूरध्वनी / मोबाईल क्रमांक ______________________

( STD कोडसह ) ______________________

4) संस्था नोंदणी क्रमांक व दिनांक : ______________________

5) संस्थेने शासकीय/निम शासकीय : ______________________

संस्थांचे/अंगणवाड्यांचे काम ______________________

केले आहे / नाही

(असल्यास त्याबाबत प्रमाणपत्र जोडणे

आवश्यक)

6) संस्था किती बालवाडी वर्ग चालवू शकते :- ______________________

क्षमता आहे .

7) संस्थेवर कोणतीही न्यायालयीन प्रकरण, फौजदारी गुन्हा दाखल आहे किंवा कसे? असल्यास, त्याबाबतची आवश्यक माहिती नमूद करावी, नसल्यास नाही म्हणून नमूद करावे. ____________________

मी/आम्ही अर्जातील सर्व नियम, अटी व शर्ती ह्या काळजीपूर्वक वाचल्या असून त्या आम्हाला मान्य आहेत. मी/आम्ही सर्व नियम, अटी व शर्तीची पूर्तता केलेली आहे. वर नमूद केलेली सर्व माहिती खरी व सत्य आहे. सदर माहिती चुकीची असल्याचे सिध्द झाल्यास अर्जदार संस्था कायदेशीर कारवाईस पात्र राहील. तसेच संस्थेच्या प्रस्तावाचा विचार करण्यात येणार नाही. याची संस्थेने नोंद घ्यावी.

संस्था अध्यक्ष/ सचिव स्वाक्षरी

ठिकाण - पूर्ण नाव : ____________________

दिनांक - पदनाम : ____________________